OK

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय: मा० स्थायी समिती सभा
दि० २०/१२/२०१३

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : प्रकरण-क्र- १३८

प्रकरण बंद केल्याची तारीख : मुळप्रत

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | २१ |
| | १३/१४ |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/१२/२०१३.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- २१ दिनांक १६/१२/२०१३**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २०/१२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २१, दि. १६/१२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक २१, दि. १६/१२/२०१३ सोबतची विषय पत्रिका
सभा शुक्रवार दि. २०/१२/२०१३

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक** |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| १३८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करणेकामी निविदा मंजूरीबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३, ठराव क्र. १०३ फेरसादर) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- १६/१२/२०१३.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक २१, दि. १६/१२/२०१३ सोबतची विषय पत्रिका
सभा शुक्रवार दि. २०/१२/२०१३

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक |
| --- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज - निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| १३८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करणेकामी निविदा मंजूरीबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३, ठराव क्र. १०३ फेरसादर) |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- १६/१२/२०१३.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूचित 'ड' प्रकरण २ ( महानगरपालिका) कामकाज नियम १ (र) प्रमाणे

प्रकरण क्र. ९३८ करिता

प्रति,
**मा. सभापती**
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करून मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करणेकामी निविदा मंजुरीबाबतचा ठराव क्र, १०३ मध्ये फेरबदलाबाबत..

**संदर्भ** :-१. मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि. सिव्हील इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचे दि. २५/१०/२०१३ चे पत्र.
२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २(२) प्रमाणे.
३. मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३ ठराव क्र.१०३ अन्वये.

महोदय,

. मिरा-भाईंदर शहराकरीता केंद्र शासनाच्या व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नरूत्थान अभियाना अंतर्गत भुयारी गटार प्रकल्प मंजूर आहे. या भुयारी प्रकल्पा अंतर्गत मलवाहीनी टाकण्याचे काम व मलनिःसारण प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे. सदरची कामे अंतिम करण्यापूर्वी शहारातील अपार्टमेंट व सोसायटीमधून येणारे Sewer ची जोडणी महापालिकेने केलेल्या मूळ मलवाहीनीस जोडणे आवश्यक आहे. मलवाहीनी जोडणी सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या एस.एम.सी. कमिटीने मजीप्राच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रूपये २२.६६ कोटीस मा. महासभेने या कामाच्या खर्चास मान्यता दिली होती. पाणीपुरवठा विभागाने या कामाच्या निविदा मागवून त्या उघडण्यांत आल्या व मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरीता दि. २९/१०/२०११ रोजीच्या सभेमध्ये मंजुरीकरीता ठेवण्यांत आल्या होत्या

| | | **निविदेची किंमत रू. २२,२०,६६,८५५/-** | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव** | **प्राप्त दर** | **शेरा** |
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर | १५३% | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. बुकऑन इंजिनियर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १६५% | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. श्रीकवीराज इन्फ्राटेक प्रा.लि. | ४५०% | तृतीय लघुत्तम |

वरील निवीदेतील दरांचा तपशील पाहता मा. स्थायी समितीस १०% पर्यंत निवीदा मंजुर करण्याचा अधिकार आहे. कामाच्या निविदा १५३% जास्त दराच्या असल्याने अश्या कामाच्या निविदा मंजुर करण्याचा अधिकार मा. स्थायी समितीस नाही.

या कामाच्या खर्चास प्रशासनाने मा. महासभेमध्ये रू.२२ कोटी ६६ लाख रक्कमेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेतलेली आहे. या कामास रू. ५४ कोटी जास्त खर्च असल्याने महासभेकडे सुधारीत मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधीत विभागाने मा. महासभेची वाढीव खर्चास मान्यता घेतलेली नाही. तसेच कामाचे नविन अंदाजपत्रक तयार केलेले नाही.

दि. २८/१०/२०१३ रोजीच्या मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि. यांनी सदर काम रू. रू. ४५ कोटी पर्यंत करणेकरीता मा. आयुक्त सो., मा. महापौर, मा. सभापती यांना पत्र दिलेली आहेत. दिलेल्या पत्राप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम २(२) प्रमाणे निविदा न मागवता देखील स्थायी समितीच्या कार्यवृत्तांत नमूद करून सदरचे काम मंजूर करण्याचा अधिकार मा. स्थायी समितीस असल्याने सदर काम हे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर यांना न देता त्यांच्यापेक्षा कमी किंमतीने काम करणाऱ्या ठेकेदारास देणेबाबत मा. स्थायी समितीमध्ये विचारविनीमय होणे आवश्यक होते. परंतु मा. स्थायी समितीने हे काम मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि. सिव्हील इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांना न देता मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स या ठेकेदारास १४३% जास्त दराने काम देण्याचा निर्णय ठराव क्र. १०३ ने घेण्यात आलेला आहे.

या निवीदेप्रक्रियेमध्ये महानगरालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनिसूचित 'ड' प्रकरण २ ( महानगरपालिका) कामकाज नियम १ (र) प्रमाणे मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३, प्रकरण क्र. ११४ ठराव क्र. १०३ वर फेरबदल/रद्द करणेकरीता मा. स्थायी समितीच्या सभेची नोटीस द्यावी. याकरीता आवश्यक असेलेल्या अधिक सदस्यांनी पाठींबा दिलेला आहे. तरी वरील तरतुदीच्या अधीन राहून या विषयावर चर्चा करणेकरीता मा. स्थायी सभा आयोजित करावी ही विनंती.

आपले विश्वासू,

१) श्री. रोहीदास शंकर पाटील

२) श्री. शरद केशव पाटील

३) श्रीम. मिरादेवी यादव

४) श्री. प्रशांत दळवी

५) डॉ. राजेंद्र जैन

६) श्री. अश्विन कासोदरीया A.S. Kasodariya

७) श्रीम. मंदाकिनी गावंड

८) श्री. हरिश्चंद्र आंमगावकर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३

प्रकरण क्र. ११४ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन मालमत्तेची मलनि:सारण जोडणी करणेकामी निविदा मंजूरीबाबत. (पाणी पुरवठा विभाग) (मा. स्थायी समिती दि. २३/१०/२०१३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ११५)

ठराव क्र. १०३ :-

मिरा भाईंदर शहराकरिता केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्नरुत्थान अभियांन अंतर्गत भुयारी गटार प्रकल्प मंजुर आहे. या भुयारी प्रकल्पाअंतर्गत मलवाहिनी टाकण्याचे कामे व मलनि:सारण केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे पूर्णत्वास जाणे पूर्वी शहरातील आपर्टमेंन्ट व सोसायटीमधून येणारे Sewer ची जोडणी महानगरपालिकेच्या मलवाहिनीस जोडणे अत्यावश्यक आहे. मलवाहिनी जोडणी सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या CSMC कमिटीने मजीप्राच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रु. २२.३० कोटी रक्कमेस दि. ३०/०१/२०१३ रोजी मान्यता दिली". त्याअनुषंगाने सदर कामाच्या निविदा वर्तमान पत्रात तसेच ई-टेंडरींग द्वारे प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेच्या प्रथम निविदा सुचना दि. १७/०२/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर निविदेची मुदत ४ वेळेस वाढवून मुदतवाढ दिली होती. वारंवार निविदेस मुदतवाढ देऊन सुध्दा योग्य प्रतिसाद मिळाला नाही.

निविदा स्पर्धात्मक होणेकरिता सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यांत आली. द्वितीय निविदा सुचना दि.२८/०८/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यांत आली.

सदर निविदा अंतिम निविदा भरण्याची मुदतीस दि. २२/०९/२०१३ रोजी कालावधीमध्ये ३ निविदा अनुक्रमे १) मे. बुकऑन इंजिनियर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. विलेपार्ले (पूर्व) मुंबई, २) मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, बोरीवली (प.) मुंबई, व ३) मे. श्रीकवीराज इन्फ्राटेक प्रा.लि. प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदाचा तांत्रिक देकार दि. २३/०९/२०१३ रोजी व आर्थिक देकार दि.२७/०९/२०१३ रोजी उघडण्यात आला त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | निविदेची किंमत रु. २२,२०,६६,८५५/- | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, | १५३ % जास्तीचे | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. बुकऑन इंजिनियर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १६५ % जास्तीचे | द्वितीय लघुत्तम |
| ३ | मे. श्रीकवीराज इन्फ्राटेक प्रा.लि. | ४५० % जास्तीचे | तृतीय लघुत्तम |

वरीलप्रमाणे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, यांचा देकार लघुत्तम असून अंदाजपत्रकीय (रु.२२,२०,६६,८५५/-) किंमतीपेक्षा १५३.००% जादा आहे. त्यामुळे त्यांना वाटाघाटीने देकार कमी करणेकरिता कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, यांनी त्यांच्या दि. १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार दर कमी करुन अंतिम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४५ % जास्तीचा आहे. सदर निविदेतील दर सन २००६-०७ च्या दरसुचीवर असून चालू दरसुचीची सन २०१२-१३ नुसार सदर निविदा १४२.०८ % जास्त दराची आहे. वाटाघाटीअंती आलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | वाटाघाटीअंती प्राप्त दर | वाटाघाटीअंती निविदेची किंमत |
|---|---|---|---|
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, | १४५ % जास्तीचे | रु. ५४,४०,६३,७९५/- |

निविदा जादा दराने आल्याची कारणे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, यांनी पुढीलप्रमाणे कळविले आहे.

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

निविदेनुसार ठेकेदाराने प्रत्येक Connection चे संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन स्वतः काम करावयाचे असून या खर्चाची तरतुद निविदेत नाही. सदरचे काम कुशलतेचे आहे व प्रत्येक कनेक्शनला रोड क्रॉसिंग आवश्यक असून त्यामध्ये युटिलिटी न तोडता काम करावयाचे आहे, तसेच कामे करतांना पाण्याचा उपसा (Dewatering) खूप मोठया प्रमाणावर करावा लागणार आहे व हे काम अतिशय अवघड आहे, तसेच निविदेतील दर हे सन २००६-०७ चे दरसुचीवरती आधारित आहेत. परंतु प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावरती काम करतांना ठेकेदारांना या सर्व बाबी कराव्या लागणार आहेत.

निविदेचे अंदाजपत्रक Item rate वरती नसून Rate Per Connection वरती आहे. त्यामुळे ठेकेदारास अनुषंगीक कामे कार्यक्षेत्रावरती कराव्या लागणार आहेत. त्यामुळे ठेकेदाराने सदर दरांचा विचार करुन निविदा भरलेली आहे. तसेच सदर निविदेमध्ये Mobilization Advance व भाववाढ कलमाचा समावेश नसून सदर कामाचा दोषदायीत्व कालावधी २ वर्षाचा आहे. तसेच भविष्यात वाढ होणारे Taxes व Duties ची तरतुद या दरामध्ये केलेली आहे.

याकामाचे तांत्रिक सल्लागार यांनी ठेकेदाराने उपस्थित केलेले वरील मुद्दे ग्राहय असून निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४५ % जादा दराने मंजूर करण्याबाबत अहवाल दिलेला आहे.

वस्तुस्थिती पाहता ठेकेदाराचे वरील उल्लेखित मुद्दे ग्राहय असून अंदाजपत्रिकीय किंमतीमध्ये वाढ होत आहे. सदर निविदेतील दराची तुलना चालू दरसुचीशी केली असता १४२.०८% जादा दराने येत आहे. परंतु सदर निविदा चालू दरसुचीवरती २.९२ % जास्तीची येत आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता निविदा १४५ % जादा दराने ( चालू दर सुचीवर २.९२ % जादा दराने) ही सभा कलम ७३ (क) नुसार कामास मंजूरी देत आहे. तसेच अतिरिक्त होणाऱ्या रक्कमेस मा. महासभेची सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. राजू भोईर | १) श्री. शरद केशव पाटील | निरंक |
| २) श्री. बर्नड डिमेलो | २) श्री. रोहिदास पाटील | |
| ३) श्रीम. अनिता जयवंत पाटील | ३) श्रीम. मिरादेवी यादव | |
| ४) श्री. मुन्ना सिंह | ४) डॉ. राजेंद्र जैन | |
| ५) श्री. प्रमोद जयराम सामंत | ५) डॉ. रमेश जैन | |
| ६) श्री. राजेश वेतोसकर | ६) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ७) श्रीम. शर्मिला बगाजी | ७) श्री. प्रशांत दळवी | |

परस्पर विरोधी दोन्ही ठरावांच्या बाजुने समसमान म्हणजेच ७-७ मते पडलेली आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील **"अनुसुची ड"** प्रकरण २, कलम ३ (फ) नुसार **"प्रत्येक प्रश्नावर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल"** अशी तरतुद आहे. श्री. शरद केशव पाटील व श्री. बर्नड डिमेलो या दोघांनी मांडलेल्या वेगवेगळ्या ठरावांवर समसमान मते पडलेली असल्याने, अधिनियमातील तदतुदीनुसार अध्यक्षस्थानी असलेल्या सभापती, स्थायी समिती यांना त्यांचे निर्णायक मत देण्यास सांगितले असता त्यांनी आपले निर्णायक मत श्री. बर्नड डिमेलो यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने दिलेले आहे. करिता श्री. बर्नड डिमेलो यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ८ (आठ) व श्री. शरद केशव पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ७ (सात) मते पडलेली आहेत. श्री. बर्नड डिमेलो यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने जास्त मते, म्हणजेच ८ (आठ) मते पडल्याने, श्री. बर्नड डिमेलो यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# A.P.I. CIVILCON PRIVATE LTD.

Civil Engineers & Contractor

ISO 9001: 2008 | ISO 14001 : 2004 | OHSAS 18001 : 2007 Approved

Telefax : 022-28783070 Email : apicivilcon@gmail.com

Tel No. 022- 28789987

(Formerly known as A.P.I. CONSTRUCTIONS)

दिनांक [illegible]

प्रति

मा. सभापती स्थायी समिती सो.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय : दिनांक २८/१०/२०१३ रोजीच्या Designing Providing & Making Sewer Property Connection in MBMC area under JNNURM Project टेंडर बाबत

महोदय

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १३/०८/२०१३ रोजीचे टेंडर मागविण्यात आले होते सदर काम आपण ठरवून दिलेल्या २२,२०,६६,८५५ कोटी च्या रक्कमेतून करवायचे होते परतु सध्याचा D.S.R. रेट फार वाढला आहे म्हणून ते काम ठरवून दिलेल्या रक्कमेतून होणार नसल्याने सदर काम करण्यासाठी आम्ही निवीदा भरली नव्हती

परतु आज आमच्या माहितीस असे आले आहे की सदर काम आपल्या मनपाद्वारे रु. ५४ कोटीला देण्यात येत आहे. तरी आम्ही आपणास निवेदन करतो की सदर कामासाठी रक्कम वाढविल्यामुळे फेर निवीदा मागविण्यात यावी अथवा सदर काम आम्ही ४५ कोटी पर्यंत वाटाघाटी करुन करण्यास तयार आहेत. त्यामुळे सदर काम आम्हाला मंजुर करुन दयावे त्यामुळे आपल्या महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान [illegible]

सदर काम करण्यासाठी आमच्याकडे लागणारे सर्व [illegible] कागदपत्रे [illegible] आहेत

आपला विश्वासू,

[signature]

प्रत : सदरसाठी लागणारे पुरावे सोबत जोडीत आहोत

१) आयुक्त मा.

२) विरोधी पक्षनेता सो.

३) कार्यकारी अभियंता सो. (S.P.M.L)

४) महापौर सो.

२८/१०/२०१३

स्वीय सहाय्यक सभापती स्थायी समिती मिरा भाईंदर महानगरपालिका

RegdOffice : 155A, Ambika Apt. Gr.Floor, Shop No.6, JawaharNagar, Goregaon (W), Mumbai 400 062

Admin Office : 168/12, Dharamjin C.H.S., Jawahar Nagar road No. 2, Goregaon (W), Mumbai 400 062